Light of Life Trust

१२९९ गावे आणि

२९३५७९ व्यक्ती

लाभान्वित

ग्रामीण भागातील
समाज परिवर्तन

# प्रभाव दर्शक अहवाल



सन २००५ ते २०२०

ग्रामीण समाजातील वंचित
बालके व महिला यांच्या जीवनात
सकारात्मक बदल घडवून आणणे
हे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे
उद्दिष्ट आहे.

# अनुक्रमणिका

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट,
२००२ साली स्थापन झालेली एक
अ-शासकीय सरकारी संस्था असून, बॉम्बे
पब्लिक ट्रस्ट ऍक्ट, १९५० अंतर्गत
नोंदणीकृत आहे.


लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट
संस्थेबद्दल माहिती ०३ ..... ०३

प्रकल्पांची माहिती ..... ०८
आनंदो प्रकल्प ..... ०९
– आनंदो आणि आनंदो प्लस प्रकल्प
– अनंत प्रकल्प
– शालेय सक्षमीकरण प्रकल्प
जागृती प्रकल्प ..... २२
– रोजगार प्रशिक्षण (तंत्र प्रशिक्षण)
– आरोग्यसेवा- फिरते दवाखाने
– पर्यावरण संवर्धन

विद्यार्थ्यांचे योगदान ..... ३०

कार्पोरेट सहाय्य ..... ३१

LOLT भागीदार ..... ३२

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला मिळालेल्या मान्यता

क्रेडीबिलीटी अलायन्स मान्यता प्राप्त

टाटा सामाजिक विज्ञान संस्था (TISS)
सह एम्पॅनेलमेंट

ग्लोबल गिविंग अर्हताप्राप्त संख्या व क्षेत्र भेटीतून प्रमाणित परिणामकारक व उच्च श्रेणी संस्था – २०२०

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट ला मिळालेले गाईड स्टार प्लेटीनम सील निर्मिती रोजगार

GuideStar India Certifications: Gold FY 2017-18, Platinum FY 18-19

# निर्मिती व इतिहास

लाइट ऑफ लाइफ ट्रस्टच्या संस्थापिका आणि व्यवस्थापकीय विश्वस्त, श्रीमती विली डॉक्टर आणि त्यांच्याप्रमाणे समान विचारसरणीच्या व्यक्तींनी एकत्र येऊन लाईट लाईफ ट्रस्टची सुरुवात केली. ग्रामीण जीवनात परिवर्तन घडवून आणणे हे उद्दीष्ट होते तर पिढ्यानपिढ्या सुरु असलेली दारिद्र्याची साखळी तोडणे हे ध्येय होते. शिक्षण हाच दारिद्र्य दूर करण्याचा मार्ग आहे अशी कल्पना होती.

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील स्थानिक समाजाच्या गरजांचा अभ्यास केल्यानंतर, कोणतेही मूल शाळाबाह्य रहाता कामा नये या विश्वासाच्या आधारे, २००५ साली कर्जत तालुक्यात २५ मुलांसमवेत आनंदो प्रकल्प सुरु करण्यात आला.

जागृती प्रकल्पाच्या माध्यमातून, महिलांकरिता समुदाय केंद्र, जेष्ठांकरिता वृद्धाश्रम, मुलांसाठी बालगृह तसेच वैद्यकीय निदान केंद्र व आंगन प्रकल्पाच्या माध्यमातून अपंग अतिथी केंद्र तसेच संशोधन व विकास केंद्र स्थापन करण्यावर संस्थापक सदस्यांनी आपले सामर्थ्य केंद्रित केले.

## ध्येय

"भारतातील ग्रामीण समाजातील वंचित व्यक्तिंच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणे हे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे ध्येय आहे."

## उद्दिष्ट

"एकेक व्यक्तिला सक्षम बनवून, पिढ्यांपासून चालत आलेली दारिद्र्य साखळी तोडणे."

## आनंदो प्रकल्प

२००५ साली सुरु झालेल्या या प्रकल्पांतर्गत, मुलांनी आत्मनिर्भर आणि सृजनशील नागरिक बनण्यासाठी, 3E च्या समग्र दृष्टिकोनातून त्यांचा कौशल्य-विकास घडवून आणला जातो व संभाव्य मुलांना शाळाबाह्य होण्यापासून परावृत्त केले जाते. 3E च्या समग्र दृष्टीकोन म्हणजेच :

- शिक्षित करणे (Educate)
- सक्षम करणे (Empower)
- रोजगारासाठी सुसज्ज करणे (Equip for Employability)

## जागृती प्रकल्प

२००९ साली सुरु झालेल्या या प्रकल्पाच्या तीन मुख्य कार्यक्रमांच्या माध्यमातून, ग्रामीण विभागातील वंचितांचा सर्वांगीण विकास साधला जातो.

- कौशल्य आणि रोजीरोटी प्रशिक्षण
- प्राथमिक आरोग्य सेवा
- पर्यावरण संवर्धन


74135
74146
74150
10344
50851
TATA
2020

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापिका आणि व्यवस्थापकीय विश्वस्त



**एक उत्कृष्ट शिक्षक, एक शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि थेरपिस्ट असणाऱ्या श्रीमती विली डॉक्टर** या लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आणि सत्यवती अध्यात्म फाउंडेनच्या संस्थापिका आहेत. 'ऑरमैक्स या सुप्रसिद्ध मार्केट रिसर्च कंपनीच्या त्या सह-संस्थापक आहे. सेंट झेविअर्स कॉलेज येथे त्यांनी सिनियर लेक्चरर म्हणून कार्य केलेले असून निर्मला निकेतन, मुंबई, येथे त्या अतिथी प्राध्यापिका होत्या. त्यांनी मुंबईच्या सोफिया कॉलेजमध्ये मनोविज्ञान विभाग प्रमुख म्हणून एक दशकभर काम केले.

मुंबईमधील पारशी (झोरास्टरियन) कुटुंबात जन्मलेल्या श्रीमती विली डॉक्टर, नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांच्या वातावरणात लहानाच्या मोठ्या झाल्या. मुंबईच्या सेंट झेवियर्स सारख्या नावाजलेल्या कॉलेजमधून पदवी संपादन केलेल्या आणि मानसशास्त्रात पदव्युत्तर पदवी मिळविलेल्या त्या हुशार विद्यार्थिनी होत. अंमली पदार्थांचे व्यसन, मद्यपान आणि वैयक्तिक भावनिक समस्या यावर युवकांना मात करता यावी म्हणून त्यांनी समुपदेशन आणि व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र सुरु केले. त्याच बरोबर, ध्यानस्थ असताना निर्माण झालेल्या मनाच्या अवस्थेने प्रेरित होऊन त्यांनी, वैयक्तिक विकासाच्या कार्यपद्धतीतील विज्ञान या माध्यमातून ध्यानस्थीतील विविध विचारांच्या अभ्यास केला आहे.

'मानवी स्वभाव' या विषयातील तीव्र स्वारस्यामुळे त्यांनी 'ग्राहकांचे वर्तन' या क्षेत्रात कार्य सुरु केले आणि त्यांच्या पतीसमवेत ऑरमॅक्स कन्सल्टंट्स ही कंपनी सुरु केली. ऑरमॅक्स सोबत दहा वर्षे काम केल्यानंतर, 'तणावमुक्तीमधील ध्यानाची भूमिका व थेरपीसाठी ध्यानधारणेचा उपयोग' याविषयी त्यांनी संशोधन सुरु केले. मानवतेच्या कल्याणासाठी, जगभरात 'सत्या ध्यानधारणा आणि उपचार केंद्र' स्थापित करण्याच्या उद्दीष्टाने त्यांनी २००९ साली 'सत्यवती स्पिरिच्युअल फाउंडेशन'ची स्थापना केली. सनफ्रान्सिस्को, न्यू जर्सी येथील गुगल मुख्यालय, टाटा इन्स्टिट्यूट फॉर फंडामेंटल रिसर्च, बीएआरसी, इन्फोसिस टेक्नॉलॉजीज लिमिटेड आणि इतर अनेक संस्थांमध्ये त्यांनी ताणतणाव व्यवस्थापन आणि ध्यानधारणा कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

दयाळू, सौम्य, नम्र वृत्तीच्या दात्या आणि कार्याला वाहून घेतलेल्या अशा श्रीमती विली डॉक्टर यांनी, एकेक व्यक्तीला सक्षम बनवून, पिढ्यांपासून चालत आलेली दारिद्र्य साखळी खंडित करण्याच्या उद्देशाने, २००२ साली लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची स्थापना केली. तेव्हापासून, त्यानी वंचित ग्रामीण समाज, विशेषत: महिला आणि मुलांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या, त्यांना सन्मानाने जगण्याचे सामर्थ्य प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने स्वत:ला समर्पित केले आहे.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट – विश्वस्त मंडळ सदस्य



**श्रीमती गायत्री रुईया, विश्वस्त** – रुईया कुटुंबातील एक तरुण आणि तडफदार उद्योजिका श्रीमती गायत्री रुईया यांनी आपले उद्योजकता कौशल्य, कला आणि फॅशन क्षेत्रांत वापरले आहे. बालशिक्षण, जलसंधारण आणि कृषि या क्षेत्रात काम करणाऱ्या आकार चॅरिटेबल ट्रस्ट या नामांकित संस्थेच्याही त्या विश्वस्त आहेत.

---



**श्री. जितेंद्र मेहता, विश्वस्त** – श्री. मेहता एक अग्रगण्य उद्योजक असून, रोटरी क्लब बॉम्बे सी फेस च्या विशेष प्रकल्पांचे अध्यक्ष आहेत. दानशूर वृत्तीचे श्री. मेहता यांनी आशियाई उपखंडात विनाशकारी त्सुनामीमुळे झालेल्या पिडित लोकांच्या मदतीसाठी मोठ्या प्रमाणात भांडवल उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ते मेहता चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक सदस्य, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक देखील आहेत.

---



**श्री. मनोज मुरारका, विश्वस्त** – आर्थिक सेवा देणारी १४० वर्ष जुनी 'बाटलीवाला आणि करानी सर्व्हिसेस लि.' ही कंपनी श्री. मुरारका चालवतात. आपला बहुतांशी वेळ ते सेवाभाव आणि युवकांचे मार्गदर्शन यासाठी व्यतीत करतात. त्यांनी ''आहत'' ही एक स्वयंसेवी संस्था देखील सुरु केली आहे. भारतातील दिव्यांग कलाकारांच्या उत्थानासाठी ''आहत'' काम करते. ना नफा तत्वावर चालणाऱ्या व्यवसायांना प्रोत्साहित करुन ते व्यवसाय दीर्घकाळ कसे चालू राहतील यादृष्टीने मार्गदर्शन करणे ही त्याची आवड आहे. ग्रामीण भारतातील किशोरवयीन मुलींच्या उन्नतीसाठी सामाजिक परिणाम निधी उभी करणारी संस्था सुरु करण्याच्या ते प्रयत्नात आहेत.

---



**श्री. पुनीत बी आनंद, विश्वस्त** – मुंबईच्या शासकीय विधी विद्यालयातून पदवी प्राप्त झालेले श्री. पुनीत आनंद, १९८९ पासून महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य आहेत. १९९१ पासून त्यांची वैयक्तिक कारकीर्द सुरू असून कॉर्पोरेट व मल्टी नॅशनल क्षेत्रातील व्यक्ती त्यांचे ग्राहक आहेत. अनेक संस्थांसाठी ते विना वेतन तत्वावर कायदेशीर सल्लागार म्हणून काम पाहतात. सन २००८ मध्ये लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापिका श्रीमती विली डॉक्टर यांनी श्री. पुनीत यांना संस्थेसाठी काम करण्याविषयी विनंती केली तेव्हापासून ते संस्थेसाठी प्रो–बोनो तत्वावर कायदेशीर सल्लागार म्हणून काम पाहतात.

## वरिष्ठ व्यवस्थापक मंडळ



**श्री. प्रदीप कोप्पीकर** – मुख्य कार्यकारी अधिकारी, (मानद), लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट.
श्री. प्रदीप कोप्पिकर आय.आय.टी. कानपूरचे पदवीधर असून त्यांनी आय.आय.एम. अहमदाबाद येथून पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. कॉपोरेट क्षेत्रातील ३८ वर्षांच्या भारतातील आणि परदेशातील उच्च पदस्थ कारकीर्दीनंतर, अगदी शिखरावर असताना, वंचित मुलांना पूर्णवेळ शिकविण्याची आपली आवड जोपासण्यासाठी त्यांनी भारतात परत येण्याचा निर्णय घेतला. ग्रामीण भागातील लोकांच्या गरजा भागविण्यासाठी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या स्वयंप्रेरित कर्मचाऱ्यांच्या संघाचे नेतृत्व करण्याचे भाग्य त्यांना लाभले. राष्ट्र म्हणून प्रगत होताना, गरजूंच्या शिक्षणासाठी नि:स्वार्थ सेवा आवश्यक आहे, आणि देवाची सेवा करण्याचा मार्गही हाच आहे असा त्यांचा विश्वास आहे.



**श्री. रमेश दासवानी** – मुख्य कार्यकारी अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट.
श्री. रमेश दासवानी यांनी वाणिज्य शाखेत पदवी संपादन केली व त्यानंतर इंटिरियर डिझायनिंगच्या वस्तूंचा कौटुंबिक व्यवसाय पुढे वाढविण्यास सुरुवात केली. त्यांच्या गाठीशी असलेल्या ३० वर्षांचा व्यावसायिक व सामाजिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, ज्ञानाची श्रीमंती व प्रखर आत्मभान घेऊन ते संस्थेसोबत जोडले गेले आहेत. त्याचप्रमाणे इंडियन मर्चंट्स चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीमध्ये सी.एस.आर. समितीचे ते अध्यक्ष आहेत, आणि रोटरी इंटरनॅशनल व क्रिकेट क्लब ऑफ इंडियाचे सक्रिय सदस्य आहेत.



**श्री. प्रदिप रॉय** – सल्लागार, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट.
श्री. प्रदिप रॉय, माजी बँक व्यावसायिक, सल्लागार तसेच डीबीआय बँक लि. चे माजी कार्यकारी संचालक असून, सध्या अनेक नामांकित कंपन्यांचे ते संचालक आहेत. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट सोबत विना वेतन तत्वावर काम करत असताना, आपल्या संपर्काचा उपयोग करुन संस्थेसाठी निधी उभा करताना त्यांना अत्यंत आनंद आणि समाधान प्राप्त होते.



**श्रीमती कमल दमानिया** – मुख्य कार्यवाही अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट.
श्रीमती कमल दमानिया यांनी, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस येथून मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी प्राप्त केलेली असून त्यांना सामाजिक विकास क्षेत्राचा ३० वर्षांहून अधिक काळ अनुभव आहे. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सर्व कार्यक्रमांचे नेतृत्व त्यांच्याकडे आहे. ते प्रकल्प संस्थेच्या ध्येय व उद्दिष्टांना अनुरुप असतील याकडे त्यांचा कटाक्ष असतो.

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने सुरु केलेले प्रकल्प

## – आनंदो प्रकल्प (शैक्षणिक)

१. आनंदो
- १.१ SFSEP (विद्यार्थी मित्र पूरक शिक्षण प्रकल्प)
- १.२ अनंत प्रकल्प

२. आनंदो प्लस


३. शालेय सक्षमीकरण कार्यक्रम

## – जागृती प्रकल्प (समुदाय विकास)

१. रोजगार प्रशिक्षण

२. फिरते दवाखाने


३. पर्यावरण संवर्धन



# आनंदो प्रकल्प


सन २००५ मध्ये सुरु केल्या गेलेल्या आनंदो प्रकल्पांतर्गत ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वंचित मुलांना पाठबळ देऊन, त्यांना शाळाबाह्य न होऊ देता शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवले जाते. त्याचप्रमाणे त्यांना स्वत:च्या पायावर उभा राहू शकणारा नागरिक होण्यासाठी, व्यवसाय कौशल्य प्रशिक्षण देऊन सुसज्ज करण्याच्या उद्देशाने काम केले जाते. या मुलांना केवळ शिक्षित करणे इतकाच माफक उद्देश नसून, 3E पद्धतीच्या माध्यमातून प्रत्येक मुलाचा सर्वांगीण विकास साधला जातो. 3E म्हणजेच **शिक्षण देणे, सक्षम बनविणे आणि रोजगारासाठी सुसज्ज करणे होय.** अशा प्रकारे करियरसाठी योग्य मार्ग निवडून लाभार्थ्यांना जीवनाच्या बदलत्या परिस्थितीला स्वीकारण्यास सक्षम बनविले जाते.

# लाभार्थ्यांचे वर्गीकरण




आनंदो प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांचे मासिक उत्पन्न, रुपये ४५०० पेक्षा कमी आहे.

# शैक्षणिक परिणाम




## माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले लाभार्थी

८५ % विद्यार्थी दहावी परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षणासाठी गेले.

७ % विद्यार्थी नापास झाले आणि पुन्हा परीक्षेला बसले नाहीत.
त्यांच्यापैकी:
२६ % मुली असून त्यांचे लग्न झाले.
७ % मुले असून ते त्यांचे कौटुंबिक व्यवसाय चालवतात.
६७ % लाभार्थी व्यवसाय प्रशिक्षण घेत आहेत / पूर्ण केले आहे.

८ % अनुतीर्ण असून ssc परीक्षेची तयारी करीत आहेत.

दहावी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ८५% विद्यार्थ्यांपैकी



१४ % कनिष्ठ महाविद्यालयात आहेत.

१२% पदवी परीक्षेचा अभ्यास करीत आहेत.

३ % व्यवसाय/ तंत्र शिक्षण घेत आहेत

२ % विद्यार्थी, उच्च तंत्र शिक्षण अथवा व्यावसायिक कोर्सेस करीत आहेत.

१०% पदवीधारक आणि पदव्युत्तर पदवी धारक आहेत


२३ % विद्यार्थी बारावी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

४ % विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षण डिप्लोमा प्राप्त केला आहे.

१७ % विद्यार्थी दहावी परीक्षा उत्तीर्ण होऊन कौशल्य विकास प्रशिक्षण घेत आहेत.

# रोजगार

लाभार्थ्यांनी निवडलेले करिअरचे पर्याय – बहुतेक मुले कनिष्ठ महाविद्यालय, पदवी, पदविका किंवा व्यावसायिक प्रशिक्षण यामध्ये असली, तरीही लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मुलांनी निवडलेल्या करिअरच्या पर्यायांमधील विविधता स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या वर्गमित्रांनी निवडलेल्या करिअर पर्यायांच्या तुलनेत ही विविधता बरीच जास्त आहे.




**१ ३७६** आनंदो लाभार्थ्यांना रोजगार मिळालेला आहे.

# आर्थिक परिणाम

## पालक-लाभार्थी तुलनात्मक उत्पन्न वितरण

- ९२ % पालकांचे मासिक उत्पन्न रु. ४५००/- पेक्षा कमी आहे.
- रोजगार असणाऱ्या ५९ % लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु. ५५००/- ते ५००००/- च्या दरम्यान आहे.

# सामाजिक परिणाम

- **लग्नाचे वय:**
- संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये लग्नाचे सरासरी वय १६ वर्ष आहे.
- लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या महिला लाभार्थ्यांचे सरासरी लग्नाचे वय २२ वर्षे आहे.
- लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कार्यामुळे २७७ आदिवासी मुले उच्च शिक्षण घेत आहेत.
- २७८ विद्यार्थी टास्क फोर्सच्या (विद्यार्थी स्वयंसेवक गट) माध्यमातून सामाजिक योगदानात अग्रेसर आहेत.


## ग्रामीण मुली उच्च शिक्षण घेत आहेत.


- लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या ३००० पेक्षा जास्त महिला लाभार्थी उच्च शिक्षण घेत आहेत.
- लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या ५६% महिला लाभार्थी उच्च शिक्षण घेत आहेत, त्या तुलनेत कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र राज्याची टक्केवारी २६% आहे.

# एका दृष्टीक्षेपात आनंदो प्रकल्प

**१४,४७३** लाभार्थी गेल्या **१५** वर्षात




- प्रकल्प सुरु झाल्यापासून आजतागायत १४४७३ लाभार्थी
- त्यापैकी ५४.९% मुली आणि ४५.१% मुले आहेत.
- ६१७६ लाभार्थी सध्या उच्च शिक्षण घेत आहेत.
- महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान आणि ओडिशा राज्यांत संस्था कार्यरत आहे.

# यशोगाथा

### सारिका खुरशिंगे



वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर येथील आदिवासी कुटुंबातील सारिका, अभ्यासात हुशार आणि ध्येयवेडी विद्यार्थिनी. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाजूक असूनही शिक्षण पूर्ण करण्याचा तिने निर्धार केला. रोजच्या आयुष्यात जगण्याचा संघर्ष करणाऱ्या तिच्या पालकांसाठी, मुलीचे शिक्षण सुरु ठेवणे हा खरोखर एक अवघड निर्णय होता. तरीही सारिका या साचेबद्ध विचारसरणीतून बाहेर पडण्यासाठी प्रवृत्त झाली. पालकांसोबत बोलून तिने पालकांना खात्री पटवून दिली आणि धैर्याने उच्च शिक्षण घेण्यासाठी गावातून बाहेर पडली. तिने २०१६ साली, ६१ % गुण मिळवून कम्प्युटर सायन्स घेऊन बी.एस.सी. यशस्वीरित्या पूर्ण केले. त्यानंतर तिने इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शनची स्पर्धा प्रवेश परीक्षा देण्याचे ठरविले. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्वप्नपुर्तीची आस यामुळे सारिका परीक्षा उत्तीर्ण झाली. २०२० मध्ये परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथे बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून, महिना ४०,००० रुपये पगारावर तिची निवड झाली. कुटुंबाला अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे. या यशाबद्दल बोलताना सारिका खुरशिंगे म्हणते, ''मी ज्या परिस्थितीत होते त्या परिस्थितीत एक मुलगी म्हणून मला हे साध्य करणे, संस्थेच्या पाठिंब्याशिवाय जमले नसते. माझी कारकीर्द घडविल्याबद्दल मी संस्थेची अत्यंत आभारी आहे.''

### महेश देवळे



महेश किन्हीराजामधील एका गरीब कुटुंबातला मुलगा आहे. त्याच्या संपूर्ण शालेय जीवनात त्याने सर्व उपक्रमात भाग घेतला, नेतृत्व म्हणजे काय हे समजून घेतले. तो बी. एससी गणित, एम. एससी. फिजिक्स आणि बी.एड या सर्व परीक्षा डिस्टिंगशन मध्ये उत्तीर्ण झाला. २०१५-१६ साली त्याने यशवंतराव चव्हाण इंग्लिश मीडियम स्कूल, मंगरूळपीर येथे विज्ञान विषय सहाय्यक शिक्षक म्हणून, महिना रुपये ९०००/- पगाराची नोकरी मिळविली. त्यानंतर गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, दिग्रस या नामांकित शाळेत त्याने इंग्रजी शिक्षक म्हणून, रुपये १५०००/- मासिक वेतनावर काम केले. सध्या तो पोदार इंटरनॅशनल स्कूल, रिसोड, वाशिम येथे, महिना ३४०००/- रुपये पगारावर नोकरी करत आहे. आनंदोच्या एका विद्यार्थ्याला त्याच्याकडून आर्थिक सहाय्य लाभले असून, रुपये ५,५००/- किंमतीची स्पर्धा परीक्षा पुस्तके त्याने वाशिममधील पाठ्यपुस्तक ग्रंथालयाला दान केलेली आहेत.

## हर्षला दिघे



वैद्यकीय क्षेत्रात करिअर करणारी खांडस या गावातील पहिली मुलगी म्हणून हर्षलाने नवा मापदंड उभा केला आहे. आपल्या गावातील पहिली डॉक्टर बनून, सर्वांनाच अत्यंत अभिमानास्पद अशी कामगिरी तिने केलेली आहे. अभ्यासात हुशार असणाऱ्या हर्षलाने दृढनिश्चयाने यशस्वी होण्याकडे वाटचाल केली. ४० किलोमीटरचा प्रवास कमी व्हावा म्हणून दहावीच्या परीक्षेनंतर दोन वर्षे हर्षला कर्जतला तिच्या नातेवाईकांकडे राहत असे. आपली शैक्षणिक महत्वाकांक्षा आणि कौटुंबिक आयुष्य या दोन्हीचा ताळमेळ साधण्यासाठी आठवड्यातील सुटीच्या दिवशी ती खांडसच्या घरी जात असे. तिने के.ई.एस. केळुसकर वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग येथून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या ती पनवेल महानगरपालिकेत वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करत असून, रुपये ५०,०००/- मासिक वेतन मिळवते आहे. तिने पदव्युत्तर पदवी प्रवेश परीक्षेची तयारीही केली आहे आणि ती अजून मोठी स्वप्ने पाहत आहे.

## चंद्रकांत पेरणेकर




नवी मुंबईत पोलिस हवालदार बनणारा, चंद्रकांत हा लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा पहिला विद्यार्थी होता. कर्जतपासून १५ कि.मी. अंतरावर सांडशी नावाच्या दुर्गम गावात तो राहत असे. चंद्रकांतचे वडील एक गरीब शेतमजूर होते. अत्यंत काबाडकष्ट करुन ते आपल्या कुटुंबाच्या गरजा भागवत असत. केवळ मुलभूत शिक्षण घेण्यापेक्षाही अधिक काहीतरी साध्य करण्याची महत्वाकांक्षा पूर्ण करणे चंद्रकांतला, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे पाठबळ लाभल्यामुळे शक्य झाले. त्यांने बी. कॉम पदवी पूर्ण करुन पोलिस दलात करिअर करण्याचा निर्णय घेतला. ठरविलेले ध्येय गाठण्यासाठी त्याने आपले प्रयत्न सुरुच ठेवले आणि एप्रिल २०१७ मध्ये, ९२% गुण मिळवून तो परीक्षा उत्तीर्ण झाला. अशा रीतीने पोलीस दलात रुजू होऊन त्याने आपली स्वप्ने प्रत्यक्षात आणली. पी. एस. आय. बनण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या चंद्रकांतला, वंचित विद्यार्थ्यांसोबत आपले ज्ञानभांडार खुले करुन देण्याची आणि समाजाचे ऋण फेडण्याची इच्छा आहे.

# अनंत प्रकल्प

फ्लॉवरिंग ट्री आय एन सी, यू. एस. ए. आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट यांनी २००८ साली संयुक्तपणे सुरु केलेला, अनंत हा एक कलाशिक्षण प्रकल्प आहे. या अंर्तगत, शेकडो मुलांना वाद्यसंगीत, हिंदुस्तानी कंठ संगीत, लोकसंगीत व सुगम संगीत तसेच नृत्यप्रशिक्षण दिले जाते. संगीत आणि कथाकथन विषयक हा एक अनोखा कार्यक्रम आहे. अनंतच्या माध्यमातून लाभार्थ्यांना सादरीकरणाच्या कौशल्यासह, सभाधीटपणाचा अनुभव विकसित करण्यासाठी संधी आणि व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जाते. संगीत व नृत्य विषयाचे समर्पित शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते मिळून अनंतची एक मजबूत टीम तयार झालेली आहे, जी अनंत सहभागींना त्यांच्या आशा-आकांक्षांच्या आड येणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी मार्गदर्शन करते.

## कल्पतरु - एक संगीतिका

'कल्पतरु - एक संगीतिका' या कार्यक्रमाद्वारे अनंत लाभार्थ्यांनां आपल्या कलागुणदर्शनासाठी एक व्यासपीठ मिळाले आहे. अनंतचे शिक्षक व संपूर्ण लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या टीमने या कार्यक्रमाचे संस्करण केलेले आहे. या अंतर्गत पहिला कार्यक्रम, २७ लाभार्थ्यांनी दिनांक २३ व २४ एप्रिल २०१६ या दिवशी मुंबई आणि पुणे येथे सादर केला. ०९ सप्टेंबर २०१७ रोजी मुंबईत याच कार्यक्रमाचा एक अतिरिक्त प्रयोग झाला.



# यशोगाथा



**सोनाली वैते**

अलिबागमधील दूर्लक्षित कुंटुंबातील, परंतु गायनाचे वरदान लाभलेली, सोनाली हिने आनंदो प्रकल्पाचा लाभ घेत दहावी व बारावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. अभ्यासात हुशार असल्याने तिने आय.टी.आय.चा इलेक्ट्रीशियन कोर्स पूर्ण केला. लाईट ऑफ लाईफचे पाठबळ मिळाल्याने, अनंतच्या मार्गदर्शनाखाली ती गंधर्व विद्यालयाच्या दोन व सुगम संगीताच्या तीन परीक्षा उत्तीर्ण झाली. ओ. एन. जी. सी. कंपनीत दरमहा ९०००/- रुपये पगारावर नोकरी करुन तिने कुटुंबाला आधार दिला. आता एम.एस.ई.बी. मध्ये ऑपरेटर म्हणून तिला दरमहा रुपये १८०००/- ची नोकरी मिळाली आहे. गायनाची खूप आवड असल्याने ती विविध संगीत कार्यक्रमांमध्ये गायन व अभिनय करते. २०२० मध्ये नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने यू ट्यूबवर सोनालीने गायन व अभिनय केलेले एक गाणे प्रकाशित करण्यात आले ज्यामध्ये नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून कोळी बांधव आपल्या होड्या समुद्रात घेऊन जातात व मच्छीमारी सुरु करतात हे दाखविण्यात आले आहे.



**महादेवी वाघमारे**

दारुच्या व्यसनाचे तीव्र दुष्परिणामांची झळ सोसावी लागलेल्या एका कुटुंबातील महादेवी शाळाबाह्य होणारच होती. याच कारणामुळे तिला आनंदो लाभार्थी म्हणून निवडण्यात आले. शालेय अभ्यासात कराव्या लागणाऱ्या संघर्षाचा ताण असह्य झाल्याने तिचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणावर डळमळीत होत चालला होता. जेव्हा तिची निवड अनंतच्या नृत्य शाखेत झाली तेव्हा तिने नृत्यकलेत आश्चर्यकारक विकास दर्शविला. आनंदोच्या पाठिंब्याने तिने आपले मूलभूत शिक्षण पुर्ण केले आणि भारतीय शास्त्रीय नृत्य (भरतनाट्यम) मध्ये व्यावसायिक पद्धतीने करियर करण्याचा निर्णय घेतला. व्यसनी वडिलांच्या विरोधाला न जुमानता, आई आणि आनंदो टीमच्या सहकार्याने तिला भरतनाट्यम नृत्य प्रकारमध्ये, मुंबईच्या नामांकित नालंदा नृत्य अकादमी येथे पदवी शिक्षणासाठी जागा मिळवता आली. रोजच्या रोज वर्गात वेळेवर उपस्थित राहण्यासाठी तिला ६२ कि.मी. अंतर कापावे लागत होते. अनंत अडचणींवर मात करून तिने दृढनिश्चयाने पदवी पूर्ण केली आहे. व्यावसायिकरित्या सादरीकरण तिने आधीच सुरु केले आहे आणि तिच्या नृत्य अकादमी मधील ती एक तारांकित विद्यार्थिनी आहे.

# शालेय सक्षमीकरण प्रकल्प

विद्यार्थ्यांच्या जीवनातील सर्व संबंधित घटकांचा, त्यांच्या शालेय जडणघडणीत सहभाग मिळविता यावा व त्यांनी किमान मुलभूत शिक्षण खात्रीशीररित्या पूर्ण करावे या अनुषंगाने, शालेय वर्गांची संवादात्मक आंतर्क्रिया आणि पालक व स्थानिक व्यक्ती यांच्यासोबत शिक्षकांची प्रभावी सुसंवादाची कार्यपद्धती या विषयी शिक्षकांचे सक्षमीकरण करणे या उद्देशाने शालेय सक्षमीकरण कार्यक्रमाची (SEP) सुरुवात २०१२ मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा मुख्य प्रकल्प आनंदो व शिक्षक केन्द्रीत कार्यक्रम SEP या दोन्हीतील उपक्रमांचे एकत्रीकरण करुन, जून २०१९ मध्ये आनंदो शालेय सक्षमीकरण कार्यक्रम सुरु करण्यात आला. आतापर्यंत या कार्यक्रमामुळे, ३८८ शिक्षक, ३१ शाळा आणि १२,३३१ विद्यार्थ्यांच्या जीवनात बदल घडून आला आहे.

प्रमुख घडामोडी

## शिक्षक प्रशिक्षण

नव्याने आणलेल्या संकल्पना:

- वर्ग व्यवस्थापन प्रक्रियेतील बदल
- शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर
- नाविन्यपूर्ण सहभागीता तंत्रे
- समाजसेवा कार्य पद्धतींचे उपयोजन

## विद्यार्थी कृती समिती

- १२००० विद्यार्थी अप्रत्यक्षरीत्या लाभान्वित

## पालक सहभाग

- ९५% शाळांमध्ये पालक सभा होत नव्हत्या.
- ASEP कार्यक्रमांमुळे हळूहळू पालकांची उपस्थिती वाढू लागली.

## शिक्षण मोहोत्सव

शिक्षकांच्या विकासाची व सहभागाची हमी देणारा एक अनोखा वार्षिक कार्यक्रम, ज्याचे ध्येय....

- सध्याच्या शिक्षण प्रणालीविषयी त्यांचे विचार / मते / सूचना व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.
- आणि त्यांना त्यांच्यातील कलागुण प्रदर्शित करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

# शालेय सक्षमीकरण कार्यक्रम


































आयोजित
चित्रकला










LOLT






Light of Life Trust
Project Anando
In partnership with
ADITYA BIRLA CAPITAL







# जागृती प्रकल्प

ग्रामीण भागातील वंचित समाज, विशेषत: महिला आणि युवती यांना, व्यवसाय कौशल्य प्रशिक्षण, प्राथमिक आरोग्य सेवा आणि पर्यावरण संवर्धन या माध्यमातून सक्षम बनविणे व विकसित करणे या उद्देशाने, २०१० साली जागृती प्रकल्पाची स्थापना करण्यात आली.

## रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम

जीवन आशा समुदाय केंद्रे

- रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात : तिवरे, कडाव, कशेळे
- ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात : धसई
- नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुका
- मुंबई जिल्ह्यातील कफ परेड

| | |
|---|---|
| २०२ | ज्वेलरी मेकिंग |
| १३ | निशस्त्र सुरक्षा रक्षक |
| ५७ | मोबाईल दुरुस्ती |
| १६ | जल तंत्रज्ञ |
| ६५ | बाईक दुरुस्ती |
| ५० | इंग्लिश स्पीकिंग कोर्स |
| २०८६ | ठाणे सेंटर प्रशिक्षण |
| १९ | इलेक्ट्रिशियन |
| १३ | किरकोळ |
| २९१ | छोटे कोर्स |
| १४० | आरोग्य परिचारक प्रशिक्षण |
| ३६ | पत्रकारिता |
| १३०७ | शिवणकाम |
| २१३१ | संगणक |
| १२२९ | कृषी |
| ७८८ | सौंदर्यशास्त्र |
| ४९ | बीपीओ |
| ६० | उद्योजकता |

नोंदणीकृत विद्यार्थी ८५३८

३३७६ (४५%) विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला

# यशोगाथा



अंजना अरुण विश्वास


मूळच्या कोलकाता येथे राहणाऱ्या अंजनाताई या जीवन आशा कम्युनिटी सेंटर, तिवरे येथील एक उद्योजक व कुशल कामगार आहेत. महाराष्ट्रात येण्यापूर्वी त्या पती व मुले यांच्यासोबत पश्चिम बंगालच्या दत्तपाडा गावात राहत असत. त्यांनी घराजवळच एक किराणा मालाचे दुकान थाटले होते त्यातून थोडीफार मिळकत होत असे. दुर्दैवाने त्यांना दुकान बंद करावे लागले आणि हे कुटुंब उपजीविकेसाठी कामाच्या शोधात स्थलांतरित झाले. नंतरची पाच वर्षे ते एका फार्महाऊसमधून दुसऱ्या फार्महाऊसवर नोकरीच्या शोधात फिरत राहिले. शेवटी ते कर्जतच्या तिवरे येथील एका खासगी फार्महाऊस सागर ईशा येथे पोहोचले. इथे दरमहा ७००० रुपये त्यांना मिळत परंतु त्यात त्यांचा घरखर्च आणि शैक्षणिक खर्च भागत नसे.

आता आपल्या कुटुंबाच्या गरजा कशा पूर्ण कराव्या अशी गंभीर समस्या अंजनाताईंच्या समोर उभी राहिली. अशातच त्यांनी जागृती प्रकल्पाच्या कोर्सेसविषयी ऐकले. तीन महिन्यांच्या बेसिक शिलाई व टेलरिंग कोर्ससाठी त्यांनी प्रवेश घेतला. मराठी भाषेचा गंध नसलेल्या अंजनाताईंना अंक व अक्षरे समजत नव्हती. अभ्यास करायचा म्हणजे त्यांच्यासाठी, आणि त्यांना शिकवायचे म्हणजे शिक्षकांसाठी मोठे आव्हानच होते. पण त्यांनी आव्हान स्वेच्छेने स्वीकारले आणि शिलाई व टेलरिंगचा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला. यामुळे त्यांचा आत्मविश्वास खूप वाढला. कोर्स तर पूर्ण झाला, पण आता सराव कोठे करावा, पुढे काय करावे हे प्रश्न त्यांच्या समोर उभे राहिले. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या जागृती प्रकल्पाच्या पाठिंब्याने त्यांना सरावासाठी शिलाई मशीन उपलब्ध झाले. हळू हळू त्यांना शिवणाची कामे मिळू लागली. टेलरिंग प्रॉडक्शन युनिटमध्येही त्या सामील झाल्या. युनिफॉर्म, कापडी पिशव्या वगैरे शिवून त्यांनी ३००० रुपयांपर्यंत कमाई केली. यानंतर त्यांनी ज्वेलरी डिझायनिंग कोर्ससाठी प्रवेश घेतला. कोर्स पूर्ण करुन दागिन्यांच्या उत्पादनाच्या युनिट मध्ये त्या सहभागी झाल्या. या कौशल्याच्या जोरावर त्यांनी वर्षभरात १०००० ते ११००० रुपयांपर्यंत कमाई केली.

जागृती प्रकल्पांतर्गत प्राप्त झालेल्या कौशल्याच्या जोरावर आज अंजनाताईंना आत्मविश्वास मिळाला आहे. त्या स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकल्या. भाषेतील अडचणी, निराळ्या प्रांतातील निराळी संस्कृती यासारख्या सर्व आव्हानांवर मात करण्याच्या त्यांच्या निर्धारामुळेच हे शक्य झाले. परिस्थितीवर मात करुन कुटुंबाच्या खर्चाला हातभार लावण्यासाठी मिळालेल्या प्रत्येक संधीचा त्यांनी पुरेपूर उपयोग करुन घेतला. आज अंजनाताई जीवन आशा कम्युनिटी सेंटरमध्ये काम करुन, गावातील शिवणाची कामे घेऊन दरमहा सुमारे ५००० रुपयांपर्यंत कमाई करतात.


# फिरता दवाखाना


२०१२ पासून मेडिकल मोबाईल युनिटच्या अंतर्गत कर्जत तालुका, रायगड जिल्हा, मुरबाड तालुका, ठाणे जिल्हा, अक्कलकुवा तालुका, नंदुरबार जिल्हा आणि पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर आणि राजगुरुनगर तालुक्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या वैद्यकीय सुविधा नसलेल्या दुर्गम ग्रामीण व आदिवासी भागांना प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान केली जाते.




## ५२००७

## रुग्ण व लाभार्थी



### वजनवृद्धी कार्यक्रम

६ ते १४ वर्षे वयोगटातील दुर्गम भागातील मुलांमध्ये आढळणाऱ्या कमी वजनाच्या समस्येकडे लक्ष देणे हे, २०१८ साली सुरु झालेल्या कार्यक्रमाचे उद्दीष्ट आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्यांतील मिळून एकूण २३३ विद्यार्थी लाभ घेत आहेत.

**प्रभाव:**

- २ अंगणवाड्या आणि ७ शाळा यातील एकूण २७३ विद्यार्थ्यांना या वजनवृद्धी कार्यक्रमाचा लाभ मिळाला आहे.
- निवडलेल्या शाळांमधील सर्व मुलांच्या वजनवाढीचा दर अंतिम तपासणीत, पहिल्या वर्षीच्या पूर्वतपासणीच्या तुलनेत, कमीतकमी दुप्पटीने वाढलेला दिसला.
- सर्व ९ शाळा / आंगणवाड्यांमध्ये, लाभ न मिळालेल्या मुलांच्या नमुन्यापेक्षा, लाभार्थी मुलांमध्ये वजन वाढीचा दर कमीतकमी २.५ पटीने जास्त दिसून आला.
- नवसुचीवाडी येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी ह्या आदिवासी वस्तीत आहेत. येथील ६५% मुलांच्या उंचीमध्ये ३ सेंटीमीटरपेक्षा जास्त वाढ दिसून आली आहे. हे या कार्यक्रमाचे वैशिट्य आहे.
- बहुतेक मुलांचे वजन ६ महिन्यांच्या कालावधीतच २ ते ३ किलो पर्यंत वाढले, ही वजन वाढ लक्षणीय आहे.
- अर्ध्याहून अधिक मुलांची उंची कमीतकमी २ सेंटीमीटर पर्यंत वाढली आहे आणि ३०% मुलांची उंची ६ महिन्यांच्या कालावधीत ३ सेंटीमीटरपेक्षा जास्त वाढली आहे.

# यशोगाथा



### कु. अंकिता वामन पादीर

९ वर्षांची अंकिता कर्जतपासून ४० कि. मी. अंतरावर अतिदुर्गम भागात असलेल्या नवसुचिवाडी येथे राहते. तिचे वडील शेतमजूर आहेत. ७ सदस्यांच्या या कुटुंबात ते एकटेच कमावते असून सरासरी मासिक उत्पन्न रुपये ५००० इतके आहे. अंकिता २०१९ मध्ये वजन वृद्धी कार्यक्रमात सहभागी झाली त्यानंतर केवळ ७ महिन्यांत तिचे वजन २.५ किलोग्रॅम ने वाढले आणि उंची ४ सेंटीमीटरने वाढली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट मार्फत शाळेत नियमितपणे मिळणाऱ्या पोषण आहार वितरणामुळे अंकिताचे वजन आणि उंची वाढविण्यास दखलपात्र फरक दिसून आला आहे. तिच्या शाळेच्या शिक्षकांनी सांगीतले की आहार मिळाल्याने तिची आणि इतर विद्यार्थ्यांची अभ्यासातील कामगिरी देखील सुधारली आहे. विद्यार्थ्यांनी वर्गात वेळच्या वेळी उपस्थित राहणे, लक्ष देणे, शिकविलेले समजून घेणे, ऐकणे यातही सुधारणा झाली. अशाप्रकारे, वजन वृद्धी कार्यक्रमाचे अनेक सकारात्मक परिणाम झाले आहेत. यामुळे मुलांचे आरोग्य सुधारले आणि मुलांची शैक्षणिक कार्यक्षमता वाढली.



### कु. कृतिका अनंता खांडवी

७ वर्षांची कृतिका कर्जतपासून २५ किलोमीटर दूर असलेल्या गुडवणवाडी येथे राहते. तिच्या डोळ्यांची तपासणी १५ जून २०१९ रोजी करण्यात आली होती. अधू दृष्टी, मोतीबिंदू व तिरळेपणा असल्याचे निदान झाले होते. कुटुंबाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी तिचे वडील रोजंदारीवर मजुरी करतात. कृतिका किंवा कुटूंबातील कोणत्याही सदस्यासाठी कोणताही वैद्यकीय खर्च त्यांना परवडण्यासारखा नाही. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या प्रयत्नाने, २४ जानेवारी २०२० रोजी कल्याणच्या ईशा नेत्रालय येथे कृतिकाच्या उजव्या डोळ्यातील तिरळेपणावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली.

# पर्यावरण संवर्धन कार्यक्रम


**गरीब शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे अतिरिक्त साधन** म्हणून त्यांना फळझाडे वितरीत करणे व त्यांना सातत्याने मार्गदर्शन करणे या उद्देशाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.


**कार्यक्रमातील ठळक घडामोडी**

- निर्धुर चुलींचे वाटप – **१५०**
- पाणी गाडे (वॉटर व्हील) वाटप – **१३५१**
- पर्यावरणाचे संवर्धन व्हावे म्हणून, पुन्हा पुन्हा वापर करता येईल अशी १०KW पॉवर सौर उर्जा सिस्टम, जागृती कम्युनिटी सेंटर, तिवरे, कर्जत येथे ऐकर पॉवरगॅस प्रायव्हेट लि. च्या सी.एस.आर. कार्यक्रमाचा भाग म्हणून बसवली गेली.

**१७२२९५**

**४०४० शेतकऱ्यांना फळझाडांच्या रोपांचे वाटप**



# यशोगाथा



## सचिन अंबो ठोंबरे

पर्यावरण संवर्धन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सचिन या युवा शेतकऱ्याला सन २०१७ साली ६५ फळझाडे देण्यात आली होती. लागवड प्रक्रिया समजून घेण्यासाठी आयोजित केलेल्या सर्व १२ प्रशिक्षणांमध्ये सचिन हजर राहिला होता आणि टीमच्या मार्गदर्शनाने व देखरेखीखाली त्याने काळजीपूर्वक रोपण केले होते. गावात पाणी कमी असल्याने झाडे जगविण्यासाठी सचिन दररोज २ किलोमीटर अंतरावरुन पाणी आणत असे.

पहिल्या वर्षी झाडांना ४० ते ५० डझन आंब्यांचे चांगले उत्पादन मिळाले. त्याच्या कुटुंबियांनी आनंदाने नातेवाईकांना वाटले, घरी खाल्ले आणि स्थानिक कशेळे बाजारातही २५ डझन विकले. दररोज आंबे विकायला बाजारात जाणाऱ्या सचिनच्या आईला यातून रु.३००० ते रु. ४००० ची कमाई झाली. यामुळे कुटुंबाच्या खर्चाला हातभार लागला. त्यांची काही आर्थिक देणी यातून भागली. आंबा उत्पादन घेणे आणि बाजारात नेऊन विकणे हा त्यांचा पहिलाच अनुभव होता आणि त्यांच्यासाठी हा एक चांगला धडा होता. यावर्षी कर्जतच्या तालुक्याच्या बाजारात फळे विक्री करण्याची त्यांची इच्छा आहे.



## अंकुश परशु उघडा

अंकुश बोरवाडी गावचा (किकवी) तरुण शेतकरी असून संस्थेच्या बऱ्याच कार्यक्रमांमध्ये तो सहभागी असतो. २०१५ साली पर्यावरण संवर्धन कार्यक्रमांतर्गत फळझाडांची ६३ रोपे त्याला मिळाली. २ किलोमीटर अंतरावरुन पाणी आणून त्याने रोपांची काळजी घेतली, वन्य, पशू, पक्षी, अवकाळी पाऊस आणि झाडांच्या वाढीला अपायकारक ठरणाऱ्या सर्व गोष्टींची त्याने बारकाईने काळजी घेतली. गेल्या वर्षी त्याच्याकडच्या ४ ते ५ आंब्याच्या झाडांना मोहोर आला होता. सुमारे २५ डझन आंबे मिळाले. अर्धे आंबे त्याने घरोघर जाऊन विकले त्यातून रु. १५०० ते रु. २००० मिळकत झाली आणि उरलेले कच्चे आंबे आढी घालून नंतर त्याच्या दुकानातच विकले त्यातून अजून १५०० रुपये मिळाले. अंकुशला आता चांगला अनुभव आला आहे, आत्मविश्वास वाढला आहे. या हंगामातही आंबा विकायचा त्याचा विचार आहे.












फिरता दवाखाना
Karjat – Taluka




ENVIRONMENT CONSERVATION










# विद्यार्थी सहभाग

- २५ — अमेरिकन स्कूल ऑफ बॉम्बे
- ७० — एन.एस.एस. हिल स्प्रिंग इंटरनॅशनल स्कूल
- ३० — सिम्बॉयसिस इंटरनॅशनल स्कूल
- ०४ — नरसी मोन्जी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड सायन्स
- ५५३ — द कॅथेड्रल अँड जॉन कॉनॉन स्कूल
- ०९ — किड्स फॉर किड्स शेअर अँड केअर फॉउंडेशन
- २२३ — युनिव्हर्सल बिझनेस स्कूल


















# कार्पोरेट क्षेत्र: सहभाग

- ४० — अलकार्गो लॉजिस्टिकस ली.
- ३६० — भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन ली.
- ५० — दिवाण हौसिंग फायनान्स ली.
- ८० — जॉन्सन अँड जॉन्सन प्रायव्हेट ली.
- ४६९ — फिनिक्स मार्केट सिटी रिसोर्सेस प्रा. ली.
- ०८ — ऑरमॅक्स कन्सल्टंट्स प्रा.ली.
- २०० — ऍक्सिस बँक फाऊंडेशन
- १२ — डी.सी.बी.बँक ली.
- ५० — ग्लॅक्सो स्मिथ क्लीन
- १६० — मॉर्गन स्टॅनली
- १० — रोचेस्टर इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजी
- १२ — स्टारबक्स










# आमचे सहभागी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Bettering Lives, Together ADITYA BIRLA CAPITAL | aKaR pRaKaR | ADVANZ PHARMA | AkerSolutions | allcargo logistics ltd. Ingenuity In Motion |
| ameya LOGISTICS | annam | Antelec Ltd. | arcadia shipping limited | ASAP FLUIDS Adapt Solutions, Adopt Practicality |
| Asian Star Perfection from within | atDta | ate CHANDRA FOUNDATION | Avendus | AXIS BANK FOUNDATION |
| FINSERV ACTIVATE | B&K B&K SECURITIES | BAYER | Bharat Petroleum energising lives | CHANCE AUF LEBEN e. V |
| CHILDREN'S HOPE INDIA "EVERY CHILD COUNTS" | CONCERN INDIA FOUNDATION HELPING PEOPLE HELP THEMSELVES | DHFL Changing Rules Changing Lives | DMI MANAGEMENT | D-Link Building Networks for People |
| E-CITY Ventures | EdelGive Foundation An Edelweiss Initiative | HORMIS MEMORIAL FOUNDATION FEDERAL BANK A Federal Bank CSR Initiative | firstsource | FLOWERING TREE |
| GAIL (India) Limited | Gits | Godrej PROPERTIES | GRUH FINANCE LIMITED We help you build homes | gumpro DRILLING FLUIDS |
| SOUTH ASIA INSTITUTE HARVARD UNIVERSITY | HBS REALTORS | HDFC BANK We understand your world | HDFC WITH YOU, RIGHT THROUGH | HDFC BANK PARIVARTAN A step towards progress |
| HIGH STREET PHOENIX | Höganäs | IDBI BANK | IGATE | IL&FS |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| LARSEN & TOUBRO | IndusInd Bank | ION FOUNDATION Initiate • Organise • Nurture | Unique J. B. CHEMICALS & PHARMACEUTICALS LIMITED | Johnson & Johnson PRIVATE LIMITED | kotak Education Foundation |

# आमचे सहभागी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA LIC GOLDEN JUBILEE FOUNDATION | LIONS INTERNATIONAL | LIONS QUEST A Program of Lions Clubs International Foundation | Lions Club of Bombay (Queensway) Silver Jubilee | Mastek |
| MEHTA CHARITABLE TRUST | MOTILAL OSWAL | Chhatrapati Shivaji INTERNATIONAL AIRPORT MUMBAI | | Narotam Sekhsaria Foundation |
| NAVNEET FOUNDATION FOR IT IS IN GIVING THAT WE RECEIVE | N.I.F. | NRB BEARINGS | NSS HILL SPRING INTERNATIONAL SCHOOL | NTAsset |
| omkar FOUNDATION | PEROJSHAW DHUNJISHAW BOLTON CHARITIES | Prabhudas Lilladher POWERING YOUR FINANCIAL GROWTH | PRECISION | PREMIUM |
| PRIX Italia | RALLIS INDIA LIMITED A TATA Enterprise | rivera stiftung A GERMAN CHARITY TRUST | RIVERGATE RESORT | ROSY BLUE MORE THAN DIAMONDS |
| Rotary eClub One | ROTARY CLUB OF BOMBAY CENTRAL | ROTARY CLUB OF BOMBAY HANGING GARDEN R.I. DIST. 3141 INDIA | ROTARY CLUB OF BOMBAY WORLI | SAFFRON energising ideas |
| Sar-La EDUCATION TRUST WORLD OF EDUCATION | SBI Life INSURANCE With Us, You're Sure | SBI MUTUAL FUND A PARTNER FOR LIFE | selvel Publicity & Consultants pvt. ltd. | SERUM INSTITUTE OF INDIA PVT. LTD. Cyrus Poonawalla Group |
| SHARE & CARE FOUNDATION | Shriyans Prasad Charitable Trust | SOPAN | STERLING & WILSON | StockHolding We look after everything |
| STONE SHIPPERS LTD. | SUBURBAN DIAGNOSTICS PRECISE TESTING · HEALTHIER LIVING | TATA TRUSTS | THE CATHEDRAL & JOHN CONNON SCHOOL | The Zoroastrian Co-operative Bank Ltd. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| TRIO | Union Bank Social Foundation | VIBHUM CHARITABLE TRUST | vodafone | VOLTAS | WELSPUN INDIA HOME TEXTILES |

# संपर्कासाठी


**नोंदणीकृत कार्यालय:**
१८१, डिजिटल प्लॅनेट, हिल रोड, वांद्रे पोलिस स्टेशनच्या पुढे,
वांद्रे (प), मुंबई - ४०० ०५०.
दूरध्वनी: +९१-२२-२२६५ ७७९२
Email: ho@lolt.in

**मुख्य कार्यालय:**
एक बीकेसी, सी-विंग, युनिट क्रमांक १५१९,
प्लॉट क्रमांक सी - ६६, जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पु), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी: +९१-२२-६९०४ ७४७० • Email: ho@lolt.in

**शाखा कार्यालये:**
**महाराष्ट्र** • अहमदनगर • अलिबाग • जालना • कर्जत • माणगांव • मुरबाड • नंदुरबार • वरळी • वाशिम • यवतमाळ
**मध्य प्रदेश** • सिवनी | **ओडिशा** • अंगुल | **राजस्थान** • बिजोलिया

LightOfLifeTrustIndia
@lightoflifetrst
@lightoflifetrust_lolt
youtube.com/c/lightoflifetrust
lightoflifetrust
www.lightoflifetrust.org